महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.रासीक/प्र.क्र.६५/विभा.सुसं.कार्य./नागपूर/अमरावती/२१८ दिनांक: १८/०२/२०२०

## परिपत्रक

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत आयोजित विभागीय सुसंवाद कार्यक्रमाकरीता सर्व व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्था/महाविद्यालयांचे उपस्थितीबाबत...**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अन्वये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची स्थापना झाली. सदर अधिनियमातील नमुद तरतुदीनूसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षा आणि केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात.

सदर केंद्रिभूत प्रवेश प्रकिया राबविण्यात महाविद्यालयांना प्रत्यक्षात उद्‌भवणाऱ्या तांत्रिक अडचणी/शंका, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तसेच संस्थांना सीईटी कक्षाकडून अपेक्षित असणाऱ्या सुधारणा समजून घेण्याकरीता विभागीय स्तरावर महाविद्यालयांशी सुसंवाद साधण्यासाठी नागपूर आणि अमरावती या दोन विभागावर खालीलप्रमाणे विभागीय सुसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमातील जास्तीत जास्त वेळ संस्थांच्या प्रतिनिधींना संवाद साधण्यासाठी देण्यात येणार आहे. प्रतिनिधींनी आपल्या अडचणी नमुद करणे व त्यावर उपाय सूचविणे या सूसंवादा दरम्यान अपेक्षित आहे.

<table>
<tr><th colspan="5">नागपूर विभाग</th></tr>
<tr><td rowspan="3">जिल्ह्यांची नावे</td><td>१) नागपूर</td><td>२) भंडारा</td><td>३) चंद्रपूर</td><td>४) गडचिरोली</td></tr>
<tr><td>५) गोंदिया</td><td>६) वर्धा</td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="4">वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी ०२.४०</td></tr>
<tr><td>दिनांक - ०४/०३/२०२०<br>वार - बुधवार</td><td colspan="4">तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/वैद्यकीय शिक्षण/आयुष शिक्षण/कला शिक्षण/मत्स व दुग्ध आणि कृषी शिक्षण पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सर्व महाविद्यालये</td></tr>
<tr><td colspan="5">स्थळ - सभागृह, जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ कॉमर्स, सायंन्स आणि टेक्नॉलॉजी, श्री मोहिनी कॉम्प्लेक्स, ३४५ पहिला मजला, किंग्स वे रोड, नागपूर - ४४० ००१.</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="5">अमरावती विभाग</th></tr>
<tr><td rowspan="3">जिल्ह्यांची नावे</td><td>१) अमरावती</td><td>२) अकोला</td><td>३) बुलढाणा</td><td>४) वाशिम</td></tr>
<tr><td>५) यवतमाळ</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="4">वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी ०२.४०</td></tr>
<tr><td>दिनांक - २१/०३/२०२०<br>वार - शनिवार</td><td colspan="4">तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/वैद्यकीय शिक्षण/आयुष शिक्षण/कला शिक्षण/मत्स व दुग्ध आणि कृषी शिक्षण पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सर्व महाविद्यालये</td></tr>
<tr><td colspan="5">स्थळ - सभागृह, एच.व्ही.पी.एम. डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, हनुमान व्यायाम नगर, श्री एकवीरा देवी मंदिराजवळ, श्री.एच.व्ही.पी. मंडळ, अमरावती - ४४४ ६०५.</td></tr>
</table>

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विभागनिहाय जिल्हयांतील पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व महाविद्यालयांचे प्रवेश प्रकियेशी निगडीत प्रत्येकी ३ प्रतिनिधींनी आयोजित कार्यक्रमासाठी निश्चित वेळेत उपस्थित रहावे.

तसेच वेळापत्रकानुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या प्रतिनिधींशी संवाद साधने शक्य होणार नाही, करीता महाविद्यालय प्रतिनिधींनी त्यांना व विद्यार्थ्यांना उद्‌भवलेल्या अडचणी/शंका/तक्रारी/सुचना सोबत जोडलेल्या अभिप्रायामध्ये (Feedback Form) भरुन कार्यक्रम स्थळावरील स्थापित केलेल्या नोंदणी कक्षाकडे (Registration Desk) जमा करावेत, जेणेकरुन सीईटी कक्षास प्राप्त अभिप्रायांवर (Feedback form) सविस्तर अभ्यास करुन त्यावर समाधानकारक उपाय शोधून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ कशी राबविता येईल, या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.

(संदीप कदम) भाप्रसे
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत - १) अभिप्राय (Feedback Form)
२) कार्यक्रम रुपरेषा